# महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

— : नोंदणीकृत कार्यालय : —

सी.डी.ओ.हटमेंटस्, एल.आय.सी.(योगक्षेम) बिल्डींग समोर, मादाम कामा मार्ग, मुंबई — ४०० ०२०.

दुरध्वनी : ९१–२२–२२८४ ५६७८ फॅक्स् : ९१–२२–२२८५ २१८२

९१–२२–२२०४ ४०४० ९१–२२–२२०२ ४५२१

वेबसाईट : **www.maharashtratourism.gov.in**

**E-mail:info@maharashtratourism.gov.in**

# पर्यटकांसाठी

# निवास आणि न्याहारी योजना

# महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित

## पर्यटकांसाठी निवास व न्याहारी योजना

**नोंदणीसाठी करावयाचा अर्ज**

**( दुय्यम प्रतीत सादर करणे )**

(अर्जदाराने संपूर्ण माहिती व रू.१,०००/– शुल्कासह आपला अर्ज महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नजिकच संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावा, विभागीय कार्यालयांचे पत्ते माहिती पत्रकात नमूद केलेले आहेत. पाकीटावर सदर योजनेचे नांव लिहावे.)

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ............................................

२) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता : ............................................
(टेलिफोन/टेलेक्स/फॅक्स क्रमांक) ............................................

३) अर्जदाराचा सध्याचा व्यवसाय आणि : ............................................
आर्थिक स्थिती, अर्जदाराला हॉटेल व्यवसायातील ............................................
अनुभव आहे का? असल्यास तपशील द्यावा. ............................................

४) योजनेखाली पर्यटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या जागेचे : ............................................
वर्णन (गांव, नगरपालिका, जागेचे क्षेत्रफळ, खोल्यांची ............................................
आणि खाटांची संख्या तसेच इतर सुविधा ............................................
(प्रसाधनगृहे/स्नानगृहे, टेलिफोन इ.) ............................................

५) अर्जदार क्र.४ खालील वर्णन केलेल्या जागेचा : होय / नाही.
कायदेशीर मालक आहे का?

६) अर्जदार पर्यटकांना त्याच्या उपलब्ध जागेल : ............................................
कोणत्या प्रकारची सुविधा पुरवू शकेल त्याचे वर्णन ............................................
(निवास आणि न्याहारी) ............................................

७) अर्जदाराचे उपलब्ध होणाऱ्या जागेत वास्तव्य आहे का ? : होय / नाही.

८) उपलब्ध जागा केव्हा बांधण्यात आली आणि : ..........................................
जागेच्या बांधकामाची सुरक्षिततेच्या आणि सुविधा ..........................................
दृष्टीकोनातून सद्य:स्थिती. ..........................................

९) उपलब्ध जागेपासून जवळचा मोठा रस्ता, : ..........................................
एस.टी. बसस्थानक, रेल्वे स्टेशन, विमानतळ ..........................................
किती दूर आहे? (अंतर कि.मी. मध्ये) ..........................................

१०) उपलब्ध जागेच्या जवळपास असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती.

११) उपलब्ध जागा अस्तित्वात असलेल्या गावात/शहरात : ..........................................
येणाऱ्या लोकांसाठी/पर्यटकांसाठी कोणत्या प्रकारची ..........................................
हॉटेल/लॉजिंग–बोर्डींग, धर्मशाळा यांची सुविधा ..........................................
उपलब्ध आहे? ..........................................

१२) जवळपासच्या पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांची : ..........................................
वार्षिक साधारण संख्या (स्थानिक आणि परदेशी) ..........................................

मी खाली सही करणार असे लिहून देतो की, वरील दिलेली माहिती माझ्या मते संपूर्ण खरी आहे, तसेच माझ्या अर्जाला मंजूरी मिळाल्यास मी माझी जागा फक्त पर्यटकांच्या सोयीसाठी व वापरासाठी उपयोगात आणीन.

(अर्जदाराचे नांव आणि स्वाक्षरी)

स्थळ :

दिनांक :

<u>टीप :</u> **अर्जासोबत सादर करण्यात यावयाची मूळ कागदपत्रांबद्दलची यादी जोडली आहे.**

**<u>महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेमार्फत शासनाने आदेशाप्रमाणे स्वत:च्या मालकीच्या घरामध्ये पर्यटकांसाठी निवास व न्याहारी योजना राबविण्याकरीता खालीलप्रमाणे मुळ कागदपत्र सादर करावी.</u>**

१) विहीत नमुन्याप्रमाणे नोंदणी करावयाचा अर्ज संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांकासहीत.
२) रू.१,०००/— चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) म.प.वि.म. (M.T.D.C. Ltd.) च्या नावे.
३) ७/१२ चा उतारा / प्रॉपर्टी कार्ड.
४) ७/१२ च्या उताऱ्यातील इतर संबंधीतांचे संमतीपत्र (रू.१००/— स्टॅम्प पेपरवर साक्षांकीत करून).
५) ग्रामपंचायत / नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका यांचे निवास व न्याहारी योजना राबविणेबाबत ना हरकत प्रमाणपत्र. (सोबत दिलेल्या नमुन्या प्रमाणे)
६) जागेचा आराखडा (नकाशा) **Architect Plan.**
७) स्थानिक पोलीस पाटील / पोलीस निरिक्षक / पोलीस अधिक्षकांचा चरित्र पडताळणी दाखला.
८) सध्याची घराचा टॅक्स भरल्याची पावती.
९) रेशनिंगकार्डाची छायांकित प्रत.
१०) अद्ययावत लाईट, पाणी, दुरध्वनी देयक भरणा केल्याची छायांकित प्रत
११) स्थानिक दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे ओळखपत्र
(विशेष कार्यकारी अधिकारी/सरपंच/तलाठी/डॉक्टर/वकील).
१२) घरमालकांचे परिवारासह रंगीत छायाचित्र.
१३) घराचे बाहेरील व आतील भागांचे किमान चार रंगीत छायाचित्र घरमालकाच्या वास्तव्यासह.
१४) खोल्यांचे भाडे तक्ता व खाद्यपदार्थ दरपत्रक. (सोबत दिलेल्या नमुन्या प्रमाणे)

**<u>निवास व न्याहारी योजनेच्या नुतनीकरणाकरीता खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करावीत.</u>**

१) सदर नुतनीकरणाचा अर्ज मुदत संपण्यापुर्वी १५ दिवस अगोदर संबंधीत कार्यालयात सादर करण्यात यावा.
२) अर्जासोबत खाली नमुद केल्यानुसार कागदपत्र सादर करावीत :
   १) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित (M.T.D.C. Ltd.) अशा नावे नुतनीकरण शुल्काकरीता रू.१०००/— चा धनाकर्ष.
   २) स्थानिक पोलीस पाटील / पोलीस निरिक्षकांचा चरित्र पडताळणीचा दाखला.
   ३) घराचा सध्याची टॅक्स भरल्याची पावती..
   ४) विद्युत / पाणी / दुरध्वनी देयक भरणा केल्याची अद्यावत छायांकित प्रत.
   ५) खोल्यांचे अद्यावत स्थितीत घेण्यात आलेली किमान चार रंगीत छायाचित्र.
   ६) खोल्यांचे भाडे तक्ता व खाद्यपदार्थ दरपत्रक. (सोबत दिलेल्या नमुन्या प्रमाणे)
   ७) पर्यटकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा तपशिल.
   ८) जागेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सध्याची स्थिती.
   ९) वीज भारनियमन असल्यास त्याची वेळ कळविणे व नसल्यास तसे कळविणे.

# पर्यटकांसाठी निवास आणि न्याहारी योजना

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने राज्यात विविध ठिकाणी पर्यटन संकुले बांधली आहेत. तथापि, पर्यटन विकासाच्या संदर्भात निश्चित केलेल्या सर्वच ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने स्वत: किंवा खाजगी संस्थेच्या विद्यमाने पर्यटकांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करुन देणे आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टया शक्य होणार नाही, कारण ब—याच ठिकाणी पर्यटकांचा ओघ बहुधा पर्यटन हंगामात असतो किंवा वर्षातील काही महिन्यापुरताच असतो, याचा परिणाम म्हणजे पर्यटन संकुले, विशेषत: राज्याच्या अंर्तभागात असलेली, तेथे एकूण केलेली गुंतवणूक आणि देखाभाल करण्याचा खर्च लक्षात घेता व्यापारीदृष्टया किफायतशीर होत नाहीत. त्याचबरोबर जे पर्यटक मुंबई—पुणे शहरापासून दूर असलेल्या पर्यटन स्थळास जाऊ इच्छितात त्यांच्यासाठी राज्यातील पर्यटन क्षेत्रातील छोटया शहरानजीक पर्यटकांसाठी एक तर जागा उपलब्ध नाहीत किंवा फार थोडया प्रमाणात उपलब्ध असून पर्यटकांना समाधान देऊ शकणारी निवास व्यवस्था अपूरी आहे.

राज्यात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या प्रयत्नाने स्थानिक व राज्याबाहेरील तसेच परदेशी पर्यटकांची संख्या हळूहळू वाढत आहे. राज्यातील विविध धार्मिक स्थळे, ऐतिहासिक महत्वाच्या जागा, समुद्र किनारे, डोंगरद—या आणि जंगले या ठिकाणी पर्यटकांचा ओघ वळण्याची शक्यता आहे, परंतू त्यासाठी लगेच पर्यटक संकुले बांधण्यावर खर्च करणे फायदेशीर ठरणार नाही. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अशा स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसूआले की, ब—याच ठिकाणी बंगले, कोणीही रहात नसल्याने रिकामे पडून आहेत किंवा अशा जागांचा उपयोग निवासासाठी पूर्णपणे आणि कायमस्वरुपात घरमालकांकडून केला जात नाही. काही घरमालक आपले घर, बंगले किंवा काही खोल्या विद्यार्थ्यांना काही काळाकरीता पेईंगगेस्ट तत्वावर देतात. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची अशी धारणा आहे की अशा प्रकारचे पर्यटन क्षेत्राजवळील असलेले बंगले / घरे / वाडे की जे बाराही महिने निवासासाठी वापरले जात नाहीत किंवा बंद ठेवले जातात, अशा निवास व्यवस्थेचा पर्यटकांसाठी उपयोग करुन घेता येईल. विशेषत: ज्या ठिकाणी पर्यटकांचा ओघ फक्त काही हंगामापुरता असतो, अशा ठिकाणी पर्यटकांची उत्तम प्रकारे राहाण्याची आणि न्याहारीची व्यवस्था करता येईल व कायम स्वरुपाची पर्यटन संकुले सरकारी खर्चाने बांधण्याची नजीकच्या काळात गरज पडणार नाही.

वर नमूद केलेल्याप्रमाणे स्थानिक घर मालकांची घरे / बंगले पर्यटकांच्या सोईसाठी उपलब्ध करुन दिल्यास दोन फायदे संभवतात — एक म्हणजे पर्यटकांसाठी किफायतशीर पध्दतीवर स्वच्छ, राहाण्याची आणि निवासाची घरगुती सोई उपलब्ध होईल, तसेच स्थानिक घर मालक किंवा त्यांच्या नातेवाईकांसाठी स्वयंरोजगार निर्माण होईल. दुसरा महत्वाचा फायदा म्हणजे राज्याबाहेरील किंवा परदेशी पर्यटकांना मालकांसमवेत राहून स्थानिक संस्कृती, राहाणी, चालीरिती आणि खाद्यपदार्थ यांची चांगल्या प्रकारे ओळख होईल आणि पर्यटन स्थळांना भेट दिल्याचा खरा आनंद मिळेल, याचा दुरगामी परीणाम म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे ध्येय साध्य करता येईल.

## योजनेची ठळक मार्गदर्शक तत्वे

१) 'पर्यटकांसाठी निवास आणि न्याहारी योजना' या योजनेंतर्गत काही निवडक पर्यटन स्थळांमध्ये पर्यटकांसाठी तात्पुरती राहाण्याची आणि न्याहारी देण्याची व्यवस्था होईल, अशी निवासस्थाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची मान्यता मिळवलेली असावीत.

२) पर्यटकांना वापरासाठी देण्यात येणारी जागा / बंगले / वाडे अशी निवासस्थाने अर्जदाराच्या अधिकृत मालकीची असावीत. अर्जदार जर अधिकृत मालक नसेल तर निवासस्थानाच्या अधिकृत मालकाचा, अर्जदारास योजनेस सहभागी होण्यास हरकत नसल्यासंबंधीत दाखला सादर करावा लागेल, अशा घरमालकांना / अर्जदारांना योजनेखाली प्रोत्साहन देण्यात येईल.

३) मान्यताप्राप्त जागी अर्जदार–घरमालक पर्यटकांसाठी कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त दहा खाटांची (Beds) सोय निर्माण करील.

४) जे निवासस्थान / वाडा / बंगला पर्यटकांच्या निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी वास्तू, स्वच्छ आणि शांत परिसरात असावी आणि अशा निवासस्थानी सहजरित्या जाणे शक्य व्हावे.

५) उपलब्ध होणारा वाडा / घर / बंगला उत्तम आणि मजबूत बांधकामाचा असावा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असावा, तसेच अशा घरांची रचना आकर्षक असावी.

६) जे घर / बंगला / वाडा या योजनेखाली पर्यटकांसाठी उपलब्ध होणार असेल त्या घराचे / बंगल्याचे किंवा अशा घरमालकांची अधिकृत व्यक्ती अशा घरांत बंगल्यात स्वत: राहात असावी. जागेवरील देखभालीसाठी आणि पर्यटकांची सोय पहाण्यासाठी अशा व्यक्तींची उपस्थिती आवश्यक असावी.

७) या योजनेंतर्गत घर / बंगला / वाडयामध्ये चांगल्या दर्जाचे फर्निचर, फिटींग्ज्, खाटा, इलेक्ट्रिकल कनेक्शन्स्, पडदे, दिवे वगैरेची सोय असावी, तसेच घर / बंगला / वाडा हवेशीर असावा.

८) खोल्यांमध्ये खाटांची जरुरीपेक्षा गर्दी नसावी आणि पर्यटकांना आरामदायी आणि विनाकष्टाचा सहवास मिळाल्याचा सुखकारक अनुभव यावा.

९) उपलब्ध निवासी जागेत प्रथमोपचार व अग्निशमन (First-Aid facility & Fire Extinguisher) ची व्यवस्था असावी.

१०) खोल्या भाडयाने देण्याचे व न्याहारीसाठी आकारण्यात येणा–या खाद्यपदार्थांचे दर ठरविण्याची घरमालकांना मुभा असेल, अशा ठरविलेल्या दराची किंवा दर सुधारीत केल्यासंबंधीची सुचना घरमालकाने महामंडळास आगाऊ दयावी. प्रचलित दर निवासस्थानात पर्यटकांना दिसतील अशा पध्दतीने प्रदर्शित केलेले असावेत.

११) उपलब्ध जागेत पर्यटकांचा निवास असे पर्यंत घरमालकांनी पर्यटकांच्या वैयक्तिक संरक्षणाची आणि सामानाची पुरेशी काळजी घ्यावी.

१२) जागेच्या नोंदणी काळात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिका–यांना किंवा त्यांच्या अधिकृत व्यक्तींना निवासस्थानाला भेट देण्याचा आणि तेथील व्यवस्थेची कधीही पाहणी करण्याचा अधिकार राहील.

१३)  घरमालक त्यांच्या निवासस्थानी राहाणा–या सर्व पर्यटकांची नांवे, पत्ते, राहाण्याची वेळ इत्यादी माहितीसह नोंद करील, तसेच पर्यटकांची तक्रार वगैरे नोंदण्यासाठी नोंदणी बुक ठेवील,  असे नोंदणी बुक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिका–यांनी त्यांच्या भेटीच्या वेळी मागितल्यास पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यांत यावे.

१४)  घरमालकांच्या विरुध्द पर्यटकांकडून काही तक्रारी आल्यास आणि पाहणीअंती त्या योग्य आणि ख–या ठरल्या तर घरमालकास दिलेले नोंदणीपत्र रद्द करण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला अधिकार राहील, अशा तक्रारी दूर करण्याविषयी किंवा त्याबाबत स्पष्टीकरण देण्याविषयी नोंदणीपत्रक रद्द करण्यापूर्वी घरमालकाला संधी देण्यांत येईल.

## नोंदणीपत्र देण्यापूर्वीच्या अटी

१)  अर्जदार घरमालक जे घर/बंगला/वाडा या योजनेंतर्गत पर्यटकांसाठी उपलब्ध करून देऊ इच्छितो त्या संदर्भात तो स्वत:च्या मालकीचा पुरावा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला सादर करील. अर्जदार जर अधिकृत मालक नसेल तर निवासस्थानाच्या अधिकृत मालकाचा, अर्जदारास योजनेत सहभागी होण्यास हरकत नसल्यासंबंधी 'ना हरकत दाखला' सादर करावा लागेल.

२)  जर घरमालकांची जागा एखादया हाऊसिंग सोसायटीचा भाग म्हणून असेल किंवा घरमालक अशा हाऊसिंग सोसायटीचा सभासद असेल तर अशा सोसायटीतील जागा पर्यटकांच्या वापरासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सोसायटीची लेखी पूर्वसंमती आवश्यक असेल, पर्यटकांच्या राहण्याने सोसायटीतील इतर सभासदांना कोणत्याही प्रकारची अडचण अगर त्रास होणार नाही याची घरमालक योग्य ती काळजी घेईल.

३)  या योजनेसाठी कमीत कमी दोन व जास्तीत जास्त १० पर्यंत बिछाने उपलब्ध असावेत. तसेच दोन बिछान्यांसाठी खोलीचे क्षेत्रफळ किमान १२० चौरस फूट इतके असावे.

४)  जागेची नोंदणी करण्यापूर्वी सदर जागा पर्यटकांच्या दृष्टीने योग्य आहे किंवा कसे या विषयी पाहणी पथक  पहाणी करील. या पाहणी पथकात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे संबंधित अधिकारी/प्रादेशिक अधिकारी यांचा समावेश असेल.

## नोंदणीपत्र मिळण्याबाबत कार्यपध्दती

१) इच्छुक घरमालक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला त्यांच्या विहित नमुन्यामध्ये अर्ज करील.

२) अर्ज मिळाल्याच्या (संपूर्ण माहितीसह) दिनांकापासून पंधरा दिवसांच्या अवधीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अर्जदारांचे घर सदर योजनेखाली नोंदणी करण्यासाठी प्रथम नोंदणी पात्रतेविषयी निर्णय घेईल. जर अर्जदारांनी दिलेली माहिती समाधानकारक नसेल आणि महामंडळाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार नसेल तर अर्ज नाकारला जाऊ शकतो.

३) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ खालील बाबींचा अभ्यास केल्यानंतर अर्जदारास अंतिम नोंदणीपत्र देईल.

अ) अर्जदारांनी पर्यटकांसाठी उपलब्ध करावयाच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी आणि त्याबाबतची तपासणी अधिकाऱ्यांने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला पाठविलेला पाहणी अहवाल.

ब) अर्जदाराकडे असलेल्या जागेच्या मालकी हक्काचे अधिकृत प्रमाणपत्र (Certificate) आणि पर्यटकांसाठी सोयी उपलब्ध करण्यासाठी इतर आवश्यक कागदपत्रे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सादर करणे.

क) विहित अर्जांच्या नोंदणी शुल्काचा अर्जासमवेत भरणा आणि (Processing Fees) चा तत्वत: मान्यता मिळविल्यानंतर करावयाचा भरणा.

## नियोजित योजनेमुळे स्थानिक घरमालकांना मिळणारे फायदे

१) स्थानिक घरमालकांच्या रिकाम्या जागेचा फायदेशीर उपयोग आणि पर्यटन विकास कामाला हातभार.

२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्थानिक घरमालकाच्या जागेसंबंधीचा पर्यटकांच्या माहितीसाठी प्रसिध्द णाऱ्या निर्देशिकामध्ये विनाशुल्क समावेश करण्यात येईल.

३) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विविध ठिकाणी असलेल्या पर्यटन माहिती केंद्राद्वारे स्थानिक ारमालकांच्या या योजनेखालील उपलब्ध जागेची माहिती इच्छुक पर्यटकांना देण्यात येईल.

४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्थानिक घरमालकांच्या जागेचे त्यांच्या प्रादेशिक कार्यालयांमार्फत तसेच मुख्य कार्यालयातर्फे आरक्षण करील, त्यासाठी भाडेदराच्या १० टक्के नाममात्र कमिशन आकारले जाईल. स्थानिक घरमालकांचा मार्केटिंग करण्याचा त्रास आणि खर्च वाचेल.

५) शासनाच्या संमतीने मालकांच्या जागेच्या किंमतीत (Rateble Value) किंवा इतर कर आकारणीत वाढ होणार नाही असे प्रयत्न केले जातील.

६) स्थानिक घरमालकांना त्यांच्या पर्यटकांसाठी उपलब्ध केलेल्या घरावर "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकृत मंजुरीने" अशा प्रकारची पाटी लावता येईल.

७) स्थानिक घरमालकांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विविध (Brouchers) पर्यटकांच्या माहितीसाठी वाटप करण्यात येईल.

## या योजनेखाली भरणा करण्याचे शुल्क

१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ नोंदणी पात्रते विषयी निर्णय घेईल व अर्जदार घरमालकाला रू.१,०००/– फक्त अर्जाबरोबर शुल्क डिमांड ड्राफ्टने भरावे लागेल, जर अर्ज काही कारणास्तव नामंजूर झाला तर भरणा केलेल्या रक्कमेच्या २० टक्के रक्कम कपात करून उर्वरीत ८० टक्के रक्कम व्याजाशिवाय परत केली जाईल.

२) अर्जाची पुढील छाननी करण्यासाठी तसेच अर्जदाराच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल बनविण्यासाठी आणि नोंदणीपत्र देण्यासाठी अर्जदारांस प्रस्थापित/विकसित स्थळांसाठी रू.२,५००/– व अप्रस्थापित/अविकसित स्थळांसाठी रू.१,०००/– शुल्क डिमांड ड्राफ्टने महामंडळास भरावी लागेल. नोंदणीपत्र दिल्यानंतर पर्यटकांच्या माहितीसाठी प्रसिध्द होणाऱ्या डिरेक्टरीमध्ये महामंडळ घरमालकाच्या जागेची आणि तत्संबंधी इतर माहिती प्रसिध्द करील.

**प्रस्थापित/विकासित किंवा अप्रस्थापित/अविकसित स्थळे खालील निकषावर ठरविण्यात येतील.**

अ) रू.२,५००/–, प्रस्थापित/विकसित स्थळे : महामंडळाची पर्यटक निवासे असलेली ठिकाणे (महामंडळ चालवित असलेले व भाडेपट्टयाने दिलेली), महामंडळाची कार्यालये असलेली ठिकाणे आणि महानगर पालिका / नगर पालिका/ नगर परिषद/ जिल्हा परिषद / तालुका / जिल्हा हयांच्या मुख्यालयाची (हद्दीतील) ठिकाणे.

ब) रू.१,०००/–, अप्रस्थापित / अविकसित स्थळे : उपरोक्त हद्दीतील सर्व ठिकाणे वगळून उर्वरीत सर्व ठिकाणे.

३) नोंदणीपत्राची मुदत एक वर्षाची असेल, नोंदणीपत्राच्या नुतनीकरणासाठी दरवर्षी रू.१,०००/– फक्त अर्जदार घरमालकास महामंडळाकडे भरावे लागतील.

**ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविली जात आहे**

# अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संपर्क

| | |
|---|---|
| **मुंबई :**<br>उपमहाव्यवस्थापक म.प.वि.म.<br>सी.डी.ओ. हटमेटस्, एल.आय.सी.(योगक्षेम) इमारती समोर,<br>मादाम कामा रोड,<br>मुंबई — ४०० ०२०<br>दूरध्वनी : ०२२ — २२८४ ५६७८, २२०४ ४०४०<br>फॅक्स : ०२२—२२८५ २१८२ / २२०२ ४५२१ | **रत्नागिरी:**<br>वरिष्ठ व्यवस्थापक, म.प.वि.म.,<br>द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जयस्तंभा जवळ,<br>रत्नागिरी — ४१५ ६१२.<br>दूरध्वनी : ०२३५२ — २२१५०८<br>टेले—फॅक्स : ०२३५२—२२३८४७. |
| **पुणे**<br>वरिष्ठ व्यवस्थापक, म.प.वि.म.<br>'आय' ब्लॉक, सेंन्ट्रल बिल्डींग,<br>पुणे — ४११ ००१.<br>दूरध्वनी : ०२० — २६१२ ६८६७ /२६१२ ८१६९ | **नाशिक**<br>वरिष्ठ व्यवस्थापक, म.प.वि.म.,<br>पर्यटन भवन, गव्हर्नमेंट गेस्ट हाऊस प्रिमायसेस,<br>गोल्फ क्लब ग्राऊंड जवळ,<br>नाशिक — ४२२ ००२.<br>दूरध्वनी : ०२५३ — २५७००५९<br>टेले—फॅक्स : ०२५३—२५७९३५२ |
| **औरंगाबाद**<br>वरिष्ठ व्यवस्थापक, म.प.वि.म.<br>हॉलीडे रिसॉर्ट, स्टेशन रोड,<br>औरंगाबाद — ४३१ ००१.<br>दूरध्वनी : ०२४० — २३४३१६९<br>फॅक्स : ०२४० — २३३११९८. | **सिंधुदुर्ग**<br>प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प कार्यालय, म.प.वि.म.,<br>पर्यटक सुविधा केंद्र, राष्ट्रीय महामार्ग — १७,<br>सिंधुदुर्ग नगरी (ओरस) — ४१६ ५२०.<br>टेले—फॅक्स : ०२३६२ — २२८७८५ |
| **नागपूर**<br>वरिष्ठ व्यवस्थापक, म.प.वि.म.,<br>वेस्ट हायकोर्ट मार्ग, ग्रामीण तहसील कार्यालयाजवळ,<br>सिव्हील लाईन्स्,<br>नागपूर — ४४० ००१.<br>दूरध्वनी : ०७१२ — २५३३३२५<br>फॅक्स : ०७१२ — २५६०६८०. | **कोल्हापूर**<br>माहिती व आरक्षण कक्ष, म.प.वि.म.<br>२५४/बी, उद्योग भवन, असेंब्ली मार्ग,<br>कोल्हापूर — ४१६ ००१.<br>दूरध्वनी : ०२३१ — २६५२९३५<br>फॅक्स् : ०२३१ — २६५९४३५. |

19/C

ह्या योजनेसंबंधी शासनाने, शासन निर्णय क्र. जीएन-१०९७/४१४/प्रक्र.३४/नवि. १४ दि. ३-२-९७ व क्र. व्ही पीएम् १०९७/प्रक्र/४०१/२२ दि. २७ मे १९९८ अन्वये काही सवलती जाहीर केल्या आहेत. ते शासन निर्णय खालील प्रमाणे आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे
राबविण्यात येणारी पर्यटकांसाठी.
''निवास व न्याहारी योजना''
महापालिकांनी/ नगरपरिषदांनी
मालमत्ता कर आकारण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

### नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक जीईएन-१०९७/४१४/प्रक्र.३४/नवि-१४, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि.३ फेब्रुवारी १९९७.**

**वाचावे : पर्यटन विभागाची टिप्पणी, दि. १६-१०-१९९६.**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने विविध ठिकाणी पर्यटकांसाठी संकुले बांधलेली आहेत, तथापि सर्व ठिकाणी अशी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे आर्थिक व प्रशासकीय दृष्टया शक्य होत नाही. अशा परिस्थितीत पर्यटकांच्या निवासाची व आहाराची गरज लक्षात घेता पर्यटन विकास महामंडळाने एक नवीन योजना 'निवास व न्याहारी' नावाने महराष्ट्र राज्यात सुरू करण्याचे ठरविले आहे. पेईंग गेस्ट योजनेच्या धर्तीवरच घरमालकाने आपल्या स्वतःच्या घरात पर्यटकांसाठी २-६ खोल्या उपलब्ध करून द्याव्यात अशी याची कल्पना आहे.

२) ही योजना यशस्वी आणि व्यवहार्यपणे राबविण्यासाठी शासनाने खालील निर्णय घेतलेले आहे.

शासन निर्णय :

१) राज्यातील सर्वमहानगरपालिका/ नगरपरिषदा यांनी वरील योजनेअंतर्गत जी निवास्थाने नोंदली जातील त्या घरांच्या/ निवासांच्या रेटेबल किंमतीत कोणत्याही प्रकारची वाढ करू नये.

२) या योजनेअंतर्गत नोंदणी केल्या घरासंबंधी महानगरपालिकांनी/ नगरपरिषदांनी प्रत्येक खोली मागे मालमत्ता कराचे दर १० ते २० टक्के पेक्षा जास्त वाढवू नयेत.

३) हॉटेल्स् आणि उपहारगृहे यांना लागू असलेले महानगरपालिकेचे/ नगरपालिकेचे नियम अटी आणि कर या योजनेअंतर्गत पर्यटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या सोयी/ खाद्यपदार्थ यांना लागू करण्यात येवू नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र. श्री. गुजरे)
(महाराष्ट्र शासनाचे उपसचिव)

प्रति,
संचालक/ सह संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधीकारी, सर्व महानगरपालिका, सर्व मुख्यधिकारी
सर्व संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग, पुणे
गृह विभाग/ पर्यटन निवडनस्ती (नांव-२४)

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे**
**राबविण्यात येणारी पर्यटकांसाठी**
**''निवास व न्याहरी योजना''**

**ग्रामपंचायतींनी कर आकारण्याबाबत**

## महाराष्ट्र शासन

### ग्राम विकास व जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्र. व्हीपीएम १०९७/प्र.क्र. ४०१/२२**

**मंत्रालय,मुंबई दि. २७ मे १९९८**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने विविध ठिकाणी पर्यटकांसाठी संकुले बांधलेली आहेत, तथापि, सर्व ठिकाणी अशी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे आर्थिक व प्रशासकीय दृष्टच्या शक्य होत नाही, अशा परिस्थितीत पर्यटकांच्या निवासाची व आहाराची गरज लक्षात घेता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने एक नवीन योजना 'निवास व न्याहारी' नावाने महाराष्ट्र राज्यात सुरू करण्याचे ठरविले आहे. सदर योजनेमध्ये घरमालकाने आपल्या स्वत:च्या घरात पर्यटकांसाठी २-६ खोल्या उपलब्ध करून द्याव्यात अशी कल्पना आहे.

ही योजना यशस्वी व व्यवहार्यपणे राबविण्यासाठी शासनाने खालील निर्णय घेतलेले आहेत.

**शासन निर्णय :**

१) राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी वरील योजनेअंतर्गत जी निवासस्थाने नोंदली जातील त्या घरांच्या/ निवासांच्या करात कोणत्याही प्रकारची वाढ करू नये.

२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४ (१) अन्वये हॉटेल आणि उपहारगृहे यांना लागू असलेले नियम व अटी आणि कर या योजनेअंतर्गत पर्यटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या सोयी/खाद्यपदार्थ यांना लागू करण्यात येऊ नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(रा. का. पवार)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व).
जिल्हाधिकारी (सर्व), विभागीय आयुक्त (सर्व),
गृह विभाग (पर्यटन) मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
निवड नस्ती (का.२२).



नीटविन ऑफसेट प्रिंटर्स/२०००/जानेवारी-२००९.

# ग्रामपंचायत / नगरपरिशद / नगरपालिका / महानगरपालिका यांचे निवास व न्याहारी योजना राबविण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राकरीता (नमूना)

**On Letter Head** (यांचे छापील पत्त्याच्या पत्रावर)

---

जावक क्र. दिनांक :

## ना हरकत दाखला (नमुना)

श्री/श्रीमती..............................................................राहणार मु. पो. ......................... तालुका....................... जिल्हा.................. ....यांनी दि................ रोजी दिलेल्या लेखी अर्जानुसार त्यांना त्यांचे राहते घर क्रमांक.........यात ......... खोल्या असून त्यापैकी ...... खोल्यांमध्ये महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.जीईएन्/१०९७/४१४/प्र.क्र.३४/नवि १४, दि. ०३ फेब्रुवारी १९९७ व क्र.व्हीपीएम/१०९७/प्र.क्र.४०१/२२, दि.२७ मे १९९८ मधील निर्देशानुसार पर्यटकांसाठी 'निवास व न्याहारी' योजना राबविण्याकरीता ना हरकत दाखल्याची मागणी केलेली आहे. तरी त्यांना खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळांतर्गत राबविण्यांत येणा—या **''पर्यटकांसाठी निवास व न्याहारी योजनेकरीता ना हरकत दाखला''** देण्यांत येत आहे.

<u>अटी व शर्ती :</u>

उपायुक्त/मुख्याधिकारी/नगराध्यक्ष/सरपंच
(शिक्का व सही)

## पर्यटकांसाठी निवास व न्याहारी योजना : (खोल्यांचे अद्यावत दरपत्रक)

१) अर्जदाराचे नांव, घराचे नाव व : ––––––––––––––––––––––––
संपूर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ––––––––––––––––––––––––
ई–मेल क्रमांक इत्यादी. ––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––

२) खोल्यांचे अद्यावत दरपत्रक : दिनांकः–––––––––– ते दिनांक : ––––––––––––पर्यंत.

| अ.क्र. **(Sr.No.)** | निवासी सुविधा प्रकार **(Type of accommodation)** | खोल्यांची संख्या **(No.of Rooms)** | प्रत्येक खोलीतील बिछाने व व्यक्ती. **(No.of beds in each room & Persons allowed)** | खोल्याचे भाडे **(Room tariff) Rs.** | खोल्यातील सुविधा **(Facility provided in room)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

एकूण खोल्या : (        )        एकूण बिछाने : (        )
चेक आऊट वेळ **(Check-out time) :**

दिनांक :                                        ( अर्जदाराचे नांव आणि स्वाक्षरी )